Review Of Research
ISSN 2249-894X
Impact Factor : 3.1402(UIF)
Volume - 4 | Issue - 11 | Aug - 2015

# मोहोळ तालुक्यातील ऊस शेतीच्या विकासातील लोकनेते बाबुराव पाटील सहकारी साखर कारखान्याचे विविध उपक्रम - एक चिकित्सक अभ्यास

प्रा. भारत जाधव
सहयोगी प्राध्यापक,देशभक्त संभाजीराव गरड महाविद्यालय, मोहोळ.

## प्रस्तावना :



सोलापूर जिल्ह्याची वरदायिनी उजनी धरणातून पाणी माढा व मोहोळ तालुक्याला शेतीसाठी देण्यास १९८४-८५ मध्ये झाली. त्याच बरोबर सीना-भोगावती नदी वरती कोल्हापूर पदध्दतीचे बंधारे बांधून नदी काठावरती असणाऱ्या जमिनीस पाणी देण्यासाठी पाणी सोडण्यास सुरूवात झाल्याने शेतीला पाणी मिळू लागले. प्रामुख्याने पश्चिम महाराष्ट्रातील सतत दुष्काळाच्या छायेत असणाऱ्या १३ तालुक्यामध्ये मोहोळ हा देखील दुष्काळी तालुका आहे. परंतु उजनी धरणाच्या पाण्यामुळे मोहोळ तालुक्यातील शेती ओलिताखाली आली आहे. त्यामुळे बागायत क्षेत्र वाढले. त्यामुळे नगदी पिकांकडे शेतकऱ्यांचा कल वाढला. त्यामुळे ऊसाचे क्षेत्रही मोठया प्रमाणात वाढले. त्यामुळे वाढलेल्या ऊसाची मोठी समस्या निर्माण झाली. मोहोळ तालुक्यातील वाढत्या ऊसाबरोबर शेतकऱ्यांचे आर्थिक जीवमान उंचावले पाहीजे. यासाठी मोहोळ तालुक्याचे लोकनेते बाबुराव पाटील यांना मोहोळ तालुक्यात साखर कारखाना निघाला पाहीजे असे वाटत होते. त्यांचे अपूर्ण राहीलेले स्वप्न राजन बाबुराव पाटील यांनी अनगर परिसरात " लोकनेते बाबुराव पाटील सहकारी साखर " कारखाना काढून स्वप्नपूर्ती केली.[१]

मोहोळ तालुका हा सतत दुष्काळी परिस्थितीला सामोरा जाणारा तालुका म्हणून ओळखला जातो. पावसाळा संपताच पाण्याचे दुर्भिक्ष जानवायचे ओढे, नदी, डोंगर उतारावरती असलेल्या विहीरी किंवा इतर मार्गाने थोडेसे बागायती क्षेत्र होते. परंतु उजनी धरणाच्या डाव्या-उजव्या कालव्यातून सिंचनासाठी पाणी सोडल्यानंतर मोहोळ तालुक्याच्या दक्षिण भागात सिंचन क्षेत्र वाढले. त्यामुळे ऊसाचे क्षेत्र वाढू लागले. पुढे भीमा-सीना जोडकालव्यातून सीना नदीमध्ये पाणी सोडण्यात आले. सीना नदीवरती कोल्हापूर पध्दतीचे बंधारे बांधले. या बंधाऱ्यामुळे मोहोळ तालुक्यात बागायती क्षेत्र वेगाने वाढले. शेतकरी मोठया प्रमाणात ऊसाचे पीक घेण्याकडे वळाले. त्यामुळे साखर कारखान्याची गरज भासू लागली.

आतापर्यंत मोहोळ तालुक्यातील ऊस सिध्देश्वर सहकारी कारखाना सोलापूर, भोगावती सहकारी कारखाना इर्ले-वैराग, विठ्ठल सहकारी साखर कारखाना, गुरसाळे, पंढरपूर येथे जात होता. त्यानंतर भीमा सहकारी साखर कारखाना, टाकळी (सि.) ता. मोहोळ यथे सुरु झाला मात्र मोहोळ तालुक्याचा दक्षिण-पश्चिम भागच त्याच्या कार्यक्षेत्रात येत होता. त्यामुळे खऱ्या अर्थाने साखर कारखान्याची गरज होती. या कारखान्याचे कार्यक्षेत्र संपूर्ण मोहोळ तालुका असून त्यामध्ये असणारी सर्व गावे, वाढया, वस्त्या आहे.

शासनाची मान्यता मिळाल्यानंतर लोकनेते बाबुराव पाटील सहकारी साखर कारखान्याचे भागभांडवल गोळा करण्यास शुभारंभ केला. त्यास अतिशय चांगला प्रतिसाद मिळाला. यातून उत्पादक शेतकरी सभासद १०४६९ प्रत्येकी ५००० रु. प्रमाणे ५,१८,१४,१००.०० भाग भांडवल जमा झाले. तर शासन शेअर्स १६८०० भाग प्रत्येकी ५००० रु. प्रमाणे प्रथम परत फेडीच्या हक्काने ८ कोटी ३३ लाख रु. जमा झाले. त्याचबरोबर सहकारी सोसायटया १० भाग प्रत्येकी ५००० रु. प्रमाणे ५०,००० रु. जमा झाले. असे एकूण १३,५१,६४,१०० भाग भांडवल गोळा झाले. त्यामुळे साखर कारखाना अगदी अल्पकाळात उभा राहिल्याचे दिसून येते.

वरील तक्त्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की २००१-०२ मध्ये उत्पादक सभासद संख्या १०४६९ होती ती २००६-०७ मध्ये कमी होऊन १०२११ झाल्याचे दिसते. यावरुन काही सभासदांनी आपले शेअर्स परत घेतले तसेच काही उत्पादक सभासद मयत झाल्याचे दिसते. तर सहकारी संस्थेचे सभासद २००१-०२ ते २००६-०७ पर्यंत तेवढेच राहिल्याचे दिसून येते त्याचप्रमाणे २००१-०२ मध्ये भागभांडवल ५१८१४१००.०० झाले असल्याचे दिसून येते तर २००१-०२ तेवढेच राहीले. तर शासन भागभांडवल २००१-०२ मध्ये ८,३३,००,००० होते ते २००६-०७ मध्ये ८४,००,००,०० एवढे झाले आहे.[२]

लोकनेते बाबुराव पाटील सहकारी साखर कारखान्याच्या कार्यक्षेत्रामध्ये संपूर्ण मोहोळ तालुका येत असून या तालुक्यातील सर्व १०२ गावे सामाविष्ट केली आहेत. या गावातील कारखान्याकडे जेवढा ऊस नोंद होता तेवढा सर्व गाळप केला जातो. या कारखान्यातीच्या ताब्यातील जमीन/परिसर-बिगर शेती जमीन १६५ एकर आहे. या कारखाना स्थळाच्या सर्व जमीनीचा सारा ग्रामपंचायत अनगर यांना अंशदान स्वरुपात एकरकमी ३५०० रु. भरला आहे.या कारखान्यामुळे अनगर ग्रामपंचायतीचे उत्पादन वाढले असल्याने ग्रामपंचायतीतील गावातील पायाभूत सुविधा, सुधारणा करण्यासाठी चांगला हातभार लागत आहे. त्यामुळे गावात रस्ते, दिवाबत्ती, शौचालये, गटार व्यवस्था, स्वच्छता, पाणीपुरवठा या सुधारणा झाल्याने गावातील जीवनमान सुधारल्याचे दिसून येते.[३]

**कारखाना क्षेत्रातील ऊस :**

लोकनेते बाबुराव पाटील सहकारी साखर कारखान्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील १०२ गावातील ऊस लागवड नोंद केली जाते. सन २००१-०२ मध्ये कारखान्याने चाचणी गळीत हंगाम उशीरा सुरू केला होता. कारखान्याचा गळीत हंगाम केव्हा सुरू होतो हे माहीत नसल्यामुळे ऊस नोंद केलेली नव्हती. सन २००२-०३ मध्ये ३७८७.०२ हेक्टर ऊसाची नोंद झाली तो सर्व ऊस गाळप केला. सन २००३-०४ मध्ये १९३७.१९ हेक्टर ऊस क्षेत्राची नोंद झाली. त्याचेही गाळप केले. मात्र सन २००४-०५ मध्ये पाठीमागील वर्षामध्ये दुष्काळ पडल्यामुळे कारखान्याच्या क्षेत्रातील ऊसाचे क्षेत्र कमी झाल्याने कारखान्याकडे ऊसाची नोंदही अतिशय कमी झाली. त्यामुळे हा कारखाना सुरु केलाच नाही. सन २००५-०६ मध्ये ३२५१.१७ हेक्टरची नोंद झाली त्याप्रमाणे सर्व ऊसाचे गाळप केले. सन २००६-०७ मध्ये कारखान्याकडे ८५८९.६० हेक्टर नोंद झाली त्यानुसार सरासरी गाळप झाला. त्याचबरोबर या कारखान्याने सन २००२-०३, सन २००३-०४, सन २००६-०७ मध्ये आपल्या क्षेत्राबाहेरिल महाराष्ट्रातील ऊस आणल्याचे दिसून येते.[४] मात्र असे लक्षात येते की ऊस क्षेत्राची कमी अधिक लागवडीची नोंद होत आहे. याचे कारण पावसाचे कमी अधिक प्रमाण किंवा काही शेतकरी आपला ऊस इतर कारखान्याला घालताना दिसून येते. सन २००६-०७ मध्ये मात्र पाऊसकाळ चांगला झाला असल्याने नोंद झालेल्या सर्व ऊसाचे गाळप केले असून ऊस उत्पादकांना न्याय दिल्याचे दिसून येते.[५]

लोकनेते सहकारी साखर कारखान्याची दैनिक गाळप मर्यादा १२५० मे. टनाची आहे. त्यामध्ये पहिल्या चाचणी गळीत हंगामाचे ११८७.१० मे. टनाचे गाळप केले असून पहिल्या गळीत हंगामामध्ये सन २००२-०३ मध्ये दैनिक १७०५.१० मे. टनाचे केले. तर सन २००३-०४ मध्ये कारखान्याच्या तांत्रिक अडचणीमुळे दैनिक गाळप कमी गाळप झाले. ते १९९३.६१ मे. टन झाले तर सन २००४-०५ मध्ये दुष्काळी परिस्थितीने ऊसाची लागवड फार कमी झाल्याने कारखान्याने गळीत हंगाम चालू केला नाही. सन २००५-०६ मध्ये २३०७ मे. टनाचे दैनिक गाळप केले. पाऊस चांगला झाल्याने ऊसाचे क्षेत्र वाढले होते. तर सन २००६-०७ मध्ये २२३३ मे. टनाचे गाळप केले मर्यादेपेक्षा जास्त गाळप करुन कारखाना सुस्थितीत व चांगल्याप्रकारे चालवून नोंद झालेला सर्व ऊस गाळप करुन उत्पादक शेतकऱ्यांना चांगला भाव दिला व ऊसाचे गाळपही केले. त्यामुळे परिसरातील उत्पादक शेतकऱ्यांना कारखान्याबद्दल आत्मियता आहे.[६]

या कारखान्याला शासनाने १२५० मे. टन दैनिक गाळप क्षमतेची परवानगी दिली आहे. परंतु कारखान्याच्या कार्यक्षेत्रामध्ये काही भागात जलसिंचनाच्या सुविधा वाढल्याने ऊसाचे क्षेत्रही वाढले आहे. जरी दिवसाला १२५० मे. टन गाळप क्षमता असली तरी त्यापेक्षा ज्यादा क्षमतेने गाळप केल्याशिवाय नोंद झालेल्या ऊसाचे गाळप होणार नाही म्हणून प्रत्येक हंगामामध्ये २५०० मे. टन ज्यादा गाळप केले जाते. त्याचा फायदा शेतकऱ्यांना होतो कारण ऊस वेळेत गेल्याने ऊसाचे वजन वाढते व उताराही चांगला पडते व शेतकऱ्यांचा फायदा होतो. सन २००१-०२ मध्ये कारखान्याकडे नोंद झालेला कार्यक्षेत्रातील सभासद, बिगर सभासद यांचा ऊस वेळेत गाळप केला. त्यास चांगला उतारा आला. सन २००१-०२ मध्ये ११.६३, सन २००२-०३ मध्ये ११.६७ तर सन २००३-०४ मध्ये १०.८४ उतारा मिळाला. सन २००३-०४ मध्ये दुष्काळ सदृश्य परिस्थितीमुळे गाळप सुरू केले नाही. सन २००५-०६ मध्ये साखर उतारा चांगला म्हणजे १०.६४ तर सन २००६-०७ मध्ये साखर उतारा ११.३० मिळाला. त्यामुळे या कारखान्यामधला एक वर्षाचा (सन २००३-०४) ११.८४ चा उतारा सोडला तर सरासरी ११% च्या आत नसल्याचे दिसून येते.

**कार्यक्षेत्राबाहेरचा ऊस :**

लोकनेते सहकारी साखर कारखान्याने आपल्या कारखान्याचे सभासद, बिगर सभासदाच्या ऊस गाळपाबरोबरच कार्यक्षेत्राबाहेरचा ऊस गाळप केला.

२००१-०२ चाचणी गळीत हंगामामध्ये ९२५९७ टनाचे गाळप झाले त्यामध्ये ३६३६७.८८८ टन असून ऊस हा बाहेरून आणला त्यामुळे भिमा सहकारी साखर कारखान्याकडून घेतला व इतर ऊस हा शेजारच्या तालुक्यातून आणला. त्यामध्ये भिमा सहकारी साखर कारखान्यामार्फत ऊस आणून त्याला ८१८.०० भाव दिला तर कार्यक्षेत्राच्या बाहेरून आणला त्यास अनुक्रमे ८००.००, ८५०.०० अशा प्रकारे दर देण्यात आला. सन २००२-०३ मध्ये ९६४८२.३७३ मे.टन कार्यक्षेत्राबाहेरील ऊस गळीतीसाठी आणला त्याला ७४२.४४ रू. दर दिला. सन २००३-०४ मध्ये ६१४४५.५३८ टन ऊस कार्यक्षेत्राबाहेरील ऊस गाळपासाठी आणला. त्या ऊसाला अनुक्रमे ७६८.५०, ७००.००, ७१०.०० अशा प्रकारे भाव दिला होता. सन २००४-०५ मध्ये पाठीमागील वर्षामध्ये दुष्काळी परिस्थितीमुळे ऊस लागवड होऊ शकली नाही. जो ऊस होता तो पाण्याअभावी जळून गेला. तर कांही ऊस होता इतर कारखान्याकडे किंवा चारा छावण्याला पाठवला गेला. सन २००५-०६ मध्ये कारखान्याने कार्य क्षेत्राबाहेरील १२२९.९७३ टन ऊस गाळपासाठी आणला त्या ऊसाला १३५०.०० रू. दर दिला तर सन २००६-०७ मध्ये कारखाने १,१२,३४०.८७१ टन ऊस घेतला. या क्षेत्राबाहेरील ऊसाला ८७७.९६ पैसे असा दर दिला.[७]

लोकनेते बाबुराव पाटील सहकारी साखर कारखान्याला सन २००१-०२ मध्ये चाचणी गळीत हंगाम सुरू केला. कारखान्याला १२५० मे. टन गाळपाचा परवाना मिळालेला आहे. उजनी धरणाच्या उजव्या-डाव्या कालव्यातून मोहोळ तालुक्याच्या काही भागास पाणी मिळाले. तसेच भीमा-सीना जोडकालव्यामुळे सीना भोगावती नदीवरती कोल्हापूर पध्दतीचे बंधारे बांधल्यामुळे बागायती क्षेत्र वाढले आहे. त्यामुळे कारखान्याकडे नोंद झालेला जास्तीत जास्त ऊस गाळप केले जाते.[८]

लोकनेते बाबुराव पाटील सहकारी साखर कारखान्याने चाचणी गळीत हंगाम २००१-०२ मध्ये १,०७,७३० पोती साखर उत्पादन घेतले होते परंतु पहील्या वर्षी कोणत्याही प्रकारे साखर विक्री झाली नाही. सन २००३-०४ पासून शासकीय नियमानुसार खुल्या बाजारात व लेव्ही साखर विक्री करण्यास सुरूवात केली सन २००३-०४ पासून सन २००६-०७ पर्यंत मोठ्या प्रमाणात देशांतर्गत बाजारपेठेमध्ये साखर विक्री केली.[९]

### निर्यात केलेल्या साखरेपासून मिळालेले उत्पन्न :

| वर्ष | निर्यात साखर | निर्यात साखर | मिळालेले उत्पन्न |
|---|---|---|---|
| २००५-०६ | ४९५३० | १८९६.७० | ९३९४३५५१.०० |

लोकनेते बाबुराव पाटील सहकारी साखर कारखान्याने देशातंर्गत बाजारपेठेप्रमाणेच जागतिक बाजारपेठेत साखर विकली. सन २००५-०६ मध्ये या कारखान्याची साखर मे. साकुमा एक्सपोर्ट मुबंई यांचे मार्फत ४९५३० क्विंटल साखर निर्यात केली. त्यामधून ९,३९,४३,५५१.०० रक्कम आहे. परंतु दरम्यान देशात साखरेचे उत्पादन वाढल्याने देशात व आंतरराष्ट्रीय स्थरावरती साखरेचे भाव कमी झाले. त्यामुळे केंद्र सरकारने प्रति क्विंटल १३५ रु. व महाराष्ट्र सरकारने १०० रु. आर्थिक अनुदान दिले होते. अशा प्रकारे या कारखान्याने निर्यातक्षम साखर तयार करून कारखान्याचे नाव जागतिक बाजारपठेत पोहचवले. त्यामुळे परकीय चलन भारतात येण्यास मदत झाली. यातून आपल्या देशाला परकीय चलनाची गरज आहे ती काही अंशाने भागवण्याचा प्रयत्न या कारखान्याने केल्याचे दिसून येते. त्यामुळे मोहोळ तालुक्याच्या आर्थिक विकासात भर पडली.[१०]

### कामगार :

भारतामध्ये लोकसंख्येच्या वाढत्या समस्येमध्ये वाढती बेरोजगारी ही एक देशापुढील फार मोठी समस्या आहे. राजन बाबुराव पाटील यांनी मोहोळ तालुक्यामध्ये वाढलेल्या बेकारीवरती काही प्रमाणात का होईना मात करता येईल. जर साखर कारखाना उभारणीचा प्रयत्न केला. मोहोळ तालुक्यात वाढते जलसिंचनाचे प्रकल्प यामुळे बागायती क्षेत्र वाढून ऊसाचे क्षेत्र मोठ्या प्रमाणात वाढले असल्याने कारखान्याचीदेखील गरज होती. त्यातून लोकनेते बाबुराव पाटील सहकारी साखर कारखाना अनगर यथे उभा केला. कामगाराच्या सहायाने कारखान्याची वाटचाल चांगल्या प्रकारे चालू आहे. कारखान्यावरती काम करणाऱ्या अधिकाऱ्यांसाठी स्वतंत्र बंगले असून इतर अधिकारी वर्गासाठी भव्य अशी वसाहत कारखाना स्थळावर उभारण्यात आली असून सर्व सोईंनी युक्त डांबरी रस्ते, रस्त्याच्या दोन्ही बाजूंना पथदिवे, संरक्षण व्यवस्था, गटार व्यवस्था, खेळासाठी भव्य मैदान, मुलासाठी शाळेची व्यवस्था वसाहतीमध्ये केलेली आहे.

- **कामगार कल्याण योजना :**

कोणताही उद्योग धंदा हा कुशल अकुशल कामगारावरतीच अवलंबून असतो. त्यामुळे कामगार सुखी, समाधानी, असेल तरच त्या उद्योगाची भरभराट होत असते. म्हणून कारखान्यामध्ये काम करण्यासाठी कामगार कल्याण योजना आखल्या आहेत. कामगारासाठी वसाहती आहे त्याचप्रमाणे हंगामी कामगारासाठी तरटयाची घरे बांधून निवारा केला जातो. काम करीत असताना एखादया कर्मचाऱ्यास इजा झाली, जखमी झाला, शारिरीक व्यंग आले तर आर्थिक मदत केली जाते. मृत्यू झाल्यास रोख मदत दिली जाते किंवा त्याच्या वारसास कामावरती घेतले जाते. कामगारांना पहील्या गळीत हंगामापासूनच बोनस व सानुग्रह अनुदान दिले जाते फॅमिली पेन्शन दिली जाते. कर्मचाऱ्यांना सायकल, वाहने दिली जातात. त्यांचा शासकीय नियमांनुसार विमा भरला जातो. जखमी कामगारांचा दवाखाण्याचा सर्व खर्च केला जातो. त्यामुळे कर्मचाऱ्यांनाआपण सुरक्षित असल्याची जाणीव होते. कामगारांच्या कल्याणासाठी बोनस, विमा, सानुग्रह अनुदान, भविष्य निर्वाह निधी खालीलप्रमाणे भरला आहे.

**विमा, भविष्यनिधी व इतर**

| तपशील | २००१-०२ | २००२-०३ | २००३-०४ | २००४-०५ | २००५-०६ |
|---|---|---|---|---|---|
| भविष्यनिर्वाह निधी कारखाना वर्गणी | ६७०० | १०८७४ | १४३५० | ८४८८५ | २५९०९३ |
| बोनस व सानुग्रह अनुदान | ७२,६७२ | ३,४१,७५६ | ४९०९४९ | ३२२७६६८ | २१९४२१७ |
| विमा | ४,८१,७३८ | २,९०,८९४ | ५७५८२४ | ४२५१५७ | ४६७००४ |
| फॅमिली पेन्शन कारखाना वर्गणी | १५,१७५ | २४,६८२ | २८५७४ | १९२६७२ | ५८८०७१ |

**(स्त्रोत- वार्षिक अहवाल, लोाकनेते बाबुराव पाटील सहकारी साखर कारखाना, २००१-२००६)**

सदर तक्यावरून असे दिसून येते की लोाकनेते बाबुराव पाटील सहकारी साखर कारखान्याने कामगारांच्या हिताच्या किंवा कल्याणाच्या अनेक योजना सुरू केल्याचे दिसते कामगाराच्या वेतनातून त्यांचा भविष्यनिर्वाह निधी, हप्ता वेळेत त्या खात्यामध्ये जमा केल्याचे दिसते एवढेच नाही तर कारखान्याचा असणारा वाटादेखील त्यांच्या खात्यामध्ये जमा केला जातो. बोनस व सानूग्रह अनुदानदेखील दिले जाते. सन २००१-०२ पासून ८.३३ % बोनस दिला जातो. तर सानुग्रह अनुग्रह अनुदान १० % दिला जात आहे. तसेच वीमा हप्तेदेखील वेळेत भरून काळजी घेतली जाते. प्रत्येक कर्मचाऱ्यास फॅमिली पेन्शन कारखान्याचा वाटा तात्काळ भरला जातो. त्यामुळे कारखान्यामध्ये काम करणाऱ्या प्रत्येक कर्मचाऱ्याच्या भविष्याचा विचार केला जात असल्याने कर्मचारी निश्चिंत आहेत.[११]

- **आरोग्य सुविधा :**

कामगाराचे आरोग्य सदृढ तर कारखाना सदृढ याप्रमाणे कागारांच्या आरोग्याची काळजी घेतली जाते. तज्ञ डॉक्टरांच्या कडून आरोग्यशिबीरामधून कर्मचाऱ्यांची सर्व रोग निदान शिबीरे आयोजित करून निदान केले जाते. असाध्य आजार असल्यास पूर्ण खर्च कारखाना करतो. त्याचप्रमाणे लोाकनेते बाबुराव पाटील यांच्या जयंती निमित्त दरवर्षी १ ऑगस्ट रोजी व १९ फेब्रुवारी पुण्यतिथी दिवशी अशी शिबिरे घेतले जातात. ऊस तोडणी मजुरांना देखील या सुविधा पुरवल्या जातात. आरोग्य उपकेंद्र अनगर येथील डॉक्टरांच्या कडून तपासण्या केल्या जातात. रक्तदान शिबिरे केले जातात. कारखाना स्थळावरती प्राथमिक सुविधा पुरविल्या जातात. आरोग्य उपकेंद्र अनगर यंथील डॉक्टरांच्याकडून तपासण्या केल्या जातात. रक्तदान शिबीरे आयोजित केले जातात. कारखाना स्थरावरती प्राथमिक सुविधा पुरविल्या जातात. शुध्द व चांगले पाणी कामगार व कर्मचारी ऊसतोडणी कामगारांना पुरवठा केला जातआहे. ऊस वाहतूकीसाठी असलल्या बैलगाडयाची देखभाल घेतली जाते. बैलांना पशुवैद्यकीय दवाखाना अनगर येथून तपासण्या व औषधोपचार केला जातो. पशुचिकिसा शिबीरे कारखाना स्थळावर आयोजित केली जातात.शेतकरी सभासदासाठी आरोग्य सुविधेबरोबरअसाध्य आजार झाल्यास १०,००० रु. पर्यंत मदत करतो या कारखान्याने आजपर्यंत ७,७२, ६५६ इतकी रक्कम वैद्यकीय उपचारासाठी खर्च केल्याचे दिसून येते.[१२]

**मुख्यमंत्री सहाय्यता निधी :**

लोकनेते बाबुराव पाटील सहकारी साखर कारखान्याने आम्ही ही शासनाचे देणे लागतो. त्यांच्या ऋणातून उत्तराई होण्याची इच्छा मनात असल्याने ज्यावेळी भूकंप, पूर, त्सुनामी, दुष्काळी, अशा नैसर्गिक आपत्ती आपल्या देशावर किंवा राज्यावर कोसळतात अशा वेळी कारखान्याने नैसर्गिक आपत्तीवेळी शासनास पूढील प्रमाणे आर्थिक मदत केली जाते. लोकनेते बाबुराव पाटील सहकारी साखर कारखान्याने आपली सामाजिक जबाबदरी स्विकारत २००४-०५ मध्ये ३,०६,००० आणि २००५-०६ मध्ये ७,५७,३८८ रू. एवढा निधी मुख्यमंत्री सहाय्यता निधी खात्यामध्ये जमा केलेला आहे. वरील प्रमाणे जमा केलेला निधी हा शेतकऱ्यांच्या ऊस बिलातून कपात केलेला आहे.[१३] या कारखान्याने सन २००२-०३ ते २००५-०६ पर्यंत डिझेल विक्रीमधून ७,६७,२४२ रु. नफा मिळवला आहे.[१४] अशाप्रकारे डिझेल पंपामुळे सर्वांचाच फायदा झ ाल्याचे दिसून येते कारखान्याच्या नफ्यामध्ये वाढ झाल्याचे दिसून येते. या पट्रोल-डिझेल पंपामुळे संचालक, कर्मचारी, शेतकरी व इतर वाहनधारकांची पेट्रोल-डिझेलची सोय झाली.

**शेतकऱ्यांना मदत :**

मोहोळ तालुका कारखाना कार्यक्षेत्रातील शेतकऱ्यांना, सभासद शेतकऱ्यांना कारखान्यामार्फत वेगवेगळया प्रकारची मदत दिली जाते. ऊस बेणे-कारखान्यामार्फत शेतकऱ्यांना आधुनिक पध्दतीने शेती करावी व उत्पादन जास्त घ्यावे यासाठी ऊस बेण्याच्या सुधारित जातीचे बेणे पुरविले जाते. त्यामध्ये कोशि ६७१, को.८६:०:३२, को.९४:०:१२ या जातीचे बेणे उधारीने पुरविले जाते. शेतकऱ्यांनी त्याचा ऊस कारखान्याला गाळपासाठी घालणे व ऊस बिलातून वसूल करण्याच्या अटीवरती दिले जाते.

- **शेतकरी मार्गदर्शन कार्यशाळा :**

मोहोळ तालुक्यातील पापरी येथे ५ मार्च २००५ रोजी ऊस उत्पादक शेतकऱ्यांचा मेळावा घेतला. त्यामध्ये कृषि अधिकारी कदम, तज्ञ शेतकरी यांच्या बरोबरीने पुणे येथील व्ही. एस पाटील यांनी मार्गदर्शन केले, कारखान्याचे संस्थापक अध्यक्ष राजन पाटील, कारखान्याचे व्यवस्थापकीय संचालक श्री. बेल्हेकर यांनी मार्गदर्शन केले. ऊस लागण पट्टा पध्दतीने करणे, पाण्याचे नियोजन करणे, ठिबक सिंचनाचा उपयोग करणे, सेंद्रीय खताचा उपयोग करणे, शक्यतो रासायनिक खताचा वापर टाळवा, ऊस बेणे सुधारीत पध्दतीचे लागण करणे जास्तीत जास्त ऊस उत्पादन घेणे, अधिकाऱ्यांचे मार्गदर्शन घेणे इत्यादी बाबीचे मार्गदर्शन या कार्यक्षेत्रात करण्यात आले. त्यामुळे उत्पादनात वाढ झाली. शेतकऱ्यांचे आर्थिक जीवमान उंचावले, यातून त्यांच्या आर्थिक विकासाबरोबर मोहोळ तालुक्याचा आर्थिक विकास झाला.[१५]

- **रासायनिक खत पुरवठा :**

पावसाचे प्रमाण चांगले झाले. उजनी धरण पूर्ण क्षमतेने भरले की बागायती क्षेत्र वाढले. अशा वेळेस रासायनिक खताचा तुटवडा निर्माण होतो. तेव्हा शेतकऱ्यांना खत विक्रेते चढेल किंमत घेवून खत देतात तोही दुकानदाराच्या मर्जिने घ्यावा लागतो. त्यामुळे शेतकऱ्यांची कुचंबना होते. कांही वेळेस त्यांच्याकडे पैसा नसतो. बँका कर्ज पुरवठा वेळेत करत नाहीत. त्यामुळे त्यांच्या उत्पादनावरती त्वरीत परिणाम होवून उत्पादन कमी निघते. शेतकऱ्यांची ही निराशा टाळण्यासाठी कारखाना कार्यस्थरावरती कृषि केंद्र उघडले असून शेतकऱ्यांना योग्य किमतीमध्ये खत पुरवठा केला जातो. शेतकऱ्यांना ऊस पीकासाठी ऊस बिलातून परतफेड करण्याच्या अटीवरती खत पुरवठा केला जातो. त्यामुळे शेतकऱ्यांची आर्थिक वनवन थांबुन त्याच्या एकूण उत्पादनामध्ये वाढ झाली.[१६]

साखर कारखान्यामध्ये काम करणाऱ्या कामगारांना त्यांच्या आर्थिक अडचणीतून मार्ग काढण्यासाठी कारखाना स्थळावरती सेवक सहकारी पत संस्था सुरू केली आहे."लोकनेते बाबुराव पाटील सहकारी साखर कारखाना" सेवकांची पतसंस्था मर्यादित लक्ष्मीनगर, अनगर या नावाने दि. ३१ मे २००५ मध्ये सुरू करण्यात आली असून अडी अडीचणीत मदत व्हावी यासाठी ५०,००० पर्यंतचे कर्ज सभासदांना दिले जाते. त्यामुळे या पतसंस्थेचा गरजू कर्मचाऱ्याला आर्थिक फायदा होतो.[१७]

साखर कारखान्यामार्फत दर वर्षी दिपावळीच्या सनासाठी बाजार भावापेक्षा स्वस्त दरामध्ये प्रति सभासद २० किलो ग्रॅ. साखर वाटप केले जाते. ऐन दिपावळीच्या सनाआगोदर आठ ते दहा दिवस कारखाना स्थळावरती साखर वाटप केली जाते. कारखान्यामध्ये काम करणारे स्थाई-अस्थाई कर्मचाऱ्यांनाही स्वस्त दरातील साखर दिली जाते. तसेच लग्न समारंभ किंवा इतर कोणताही कार्यक्रम असल्यास सभासदांना स्वस्त दरात साखर उपलब्ध करून दिली जाते. अशा प्रकारे आपल्या सभासदाचे व कर्मचाऱ्याचे हित जोपासले जाते.[१८]

**जनावरांच्या छावण्या :**

सोलापूर जिल्हा हा सतत दुष्काळी जिल्हा म्हणून ओळखला जातो. मोहोळ तालुका हा सतत अवर्षणप्रवण क्षेत्रामध्ये मोडतो. पाऊस चांगला झाला तर पीक चांगले येते. परंतु एकवर्ष पाऊस झाला की दोन वर्षे दुष्काळाला सामोरे जावे लागते. शेतकरी अशा अवस्थेत पशुधन जतन करण्यासाठी जिवाचे रान करतात. परंतु शेवटी त्यांचा ईलाज खुंटतो. लाख मोलाची जनावरे कसायची वाट धरू लागतात अशी कमी किमतीत ही जनावरे विकली जातात. सन २००३-०४ च्या दुष्काळामध्ये पशुधनाचे फार हाल होऊ लागले अशा परिस्थितीमध्ये पशुधन वाचवण्यासाठी लोकनेते सहकारी साखर कारखाना पुढे आला आणि कारखाना स्थळावरती जनावरांची छावणी सुरू केली. या छावनीमध्ये ३६०० जनावरांची सोय करण्यात आली होती. एवढया मोठया संख्येने असलेल्या जनावरांना मुबलक पिण्याच्या पाण्याची सोय केली. जनावरांच्या चाऱ्यासाठी ऊस, मकवान, कडवल, गव्हाची तांब, वाळलेले गवत आणून चाऱ्याचा प्रश्न मिटवला. त्याचबरोबर प्रत्येक जनावरांना दोन किलो गोळीपेंड पुरवण्याची व्यवस्था केली त्यामुळे जनावरांचे आरोग्य चांगले राहीले. कारखानास्थळावरती हजारो लहान मोठी झाडे असल्याने जनावरांना व पशुपालकांना सावली मिळाल्याने जनावरे सशक्त राहीली. अशा वैराण दुष्काळातही कारखान्यावरती सर्व सोयनीयुक्त अशी छावणी उभारल्याने शेतकऱ्यांचे पशुधन वाचले. एवढेच नाही तर दररोज हजारो लिटर दूध उत्पादन झाले. या जनावरांच्या छावणीसाठी कारखान्याने १२,३५,७८४.०० रू. खर्च केला. यामुळे दुष्काळी भागातील जनावरांचा व कांही प्रमाणात दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांची आर्थिक अडचण सोडविणेस मदत झाली. त्यामुळे अशा परिस्थितीमध्ये जनावरे वाचली म्हणजे एका अर्थाने शेतकऱ्यांचा आर्थिक फायदा झ ाला. व दुष्काळावरती मात झाल्याने आर्थिक नुकसान झाले नाही असे दिसून येते.[१९]

**साखर शाळा :**

शिक्षणाशिवाय पर्याय नाही असे जरी आपण म्हणत असलो तरी गोर गरिबांची, कष्टकऱ्यांची, अदिवाशी समाजाची, भटक्या लोकांची, ऊसतोड मजुरांची मुले आजही शिक्षणापासून वंचित आहेत. वर्षात ६ ते ७ महीने ऊसतोडणी मजुर आपली मुले-बाळे घेवून कारखान्यावरती ऊसतोडणी कामासाठी जात असतात. त्यांच्या मुलांना शिक्षण घेता येत नाही ही समस्या लक्षात घेवून शिक्षणाची आवड असल्याने या मजुरांच्या मुलांना देखील शिक्षण मिळाले पाहीजे म्हणून या कारखान्यावरती लोकनेते सर्व सेवा संघामार्फत कारखाना कार्यस्थरावरती शाळा सुरु केली. त्यांना शालोपयोगी साहित्य पुरविले जाते. कारखाना स्थळावरती २००५ पासून शाळेचे बांधकामही केले आहे. त्यामुळे हंगामामध्ये ऊसतोड मजूरांच्या मुलांना शिक्षणाची सोय झाली आहे. त्यामुळे त्यांचाही शैक्षणिक विकास मदत झाली.[२०]

लाेकनेते बाबुराव पाटील सहकारी साखर कारखाना सुरू झाल्यापासून समाजाची बांधिलकी स्विकारली आहे. पंढरपूरला आषाढी वारी, कार्तिकीवारी, मार्गषिश वारी, चैत्री वारी, अधिकमास वारी, निरनिराळया देवताना यात्रेसाठी पाई किंवा वाहनाने जाणाऱ्या वारकरी, भक्त जनाच्या जेवणाची, फराळाची, मुक्कामाची व्यवस्था केली जाते. गोरगरीबांना आर्थिक मदत केली जाते. दरवर्षी आषाढी वारीमध्ये पंढरपुरात आलेल्या वारकऱ्यांना एकादशी दिवशी "राजगिरा लाडू" फराळासाठी स्वतःचा स्टॉललावून मोफत वाटप केले जातात. यातून आपली सामाजिक बांधिलकी जोपासली जाते.[२१]

## वृक्षलागवड :

वाढत्या लोकसंख्येच्या भस्मासुराने पर्यारण संतुलन बिघडविले आहे. सततची वृक्षतोड त्यास कारणीभूत आहे. कारखान्यामुळे प्रदुषण होणार याची जाणीव असल्याने त्याच्यावरती कांही अंशाने का होईना मात करता येईल म्हणून कारखाना स्थळावरती मोठया प्रमाणात वृक्ष लागवड केली आहे. लावलेल्या झाडांची निगा राखण्याबरोबर त्यांचे संगोपन करण्यासाठी, निकोप वाढीसाठी खास पर्यावरण अधिकाऱ्यांची नेमणूक केली आहे. कारखान्यासाठी लागणारे पाणी सीना नदिवरून पाईप लाईन मार्फत आणले आहे. त्यातूनच पाणी फिल्टर करून पिण्यासाठी वापर जाते. तसेच कारखाना स्थळावरती एक '१०० × ६०' अशी विहीर खोदली आहे. तसेच कुपनलिका (बोअर) ८ अशी व्यवस्था केली आहे. त्यामुळे झाडाची वाढ मोठया प्रमाणात झाल्याचे दिसून येते. कारखानास्थळावरती रस्त्याच्या दोन्ही बाजूनी, वसाहतीच्या जवळ, खेळाच्या मैदाना शेजारी, खास बागेत राज्यमार्गाच्या दुतर्फा पुढील प्रमाणे वृक्ष लागवड केलेली आहे. चिंच-१३०३, आंबा-५६०, आवळा-३७०, जांभूळ-२४०, पेरू-२२५, चिक्कू-१३५, नारळ-८१०, रामफळ-१२, सीताफळ-८२३, अशोक-८२, सुपारी-३०, सागवान-३१७, निलगिरी-१४०, इत्यादींची लागवड केली आहे. तसेच माळरानावरती कडुलिंब, वड, पिंपळ, सिसम, बाभूळ, खैर, केकताड, जंगली गवत अशा प्रकारच्या विविध झाडांची लागवड केली आहे. या झाडांच्यामुळे कारखान्याच्या उत्पादनामध्ये वाढ होण्यास मदत झाली. त्याहीपेक्षा एवढ्या वर्दळीच्या जागेमध्ये सरपटणारे प्राणी त्यामध्ये साप, सरडे, मुंगूस, ससे, चिमण्या व इतर पक्षी, लांडगे वगैरे प्राणी आढळतात. त्यामुळे या वृक्षलागवडीमुळे कारखाना स्थळाची शोभाही वाढली व प्रदुषण काही प्रमाणात कमी करता आले. सर्वात महत्वाचा फायदा ऊसतोड मजूरांच्या जनावरांना सावली मिळाली. कारखान्यावरती येणाऱ्या प्रत्येकाला प्रसन्न वाटणारे वातावरण निर्माण झाल्याने कारखान्याचा आदर वाढत आहे.[२२] कारखाना शुशोभिकरणाच्या हेतूने बागबगीच्या मोठया प्रमाणात तयार केला आहे. यामध्ये गुलाब, कन्हेरी, मोगरा,झेंडू, बॉटल पाम, आरेका पॉम, धयकस, सिलवर ओक, बोगन वेळ, इत्यादिंनी बागबगीचा सुंदर बनविण्याचा प्रयत्न केला आहे.

कोणताही उद्योग व्यवसाय करायचा झाला तर त्यास पैशाची गरज असते. त्या उद्योगाकडे जमा झालेल्या भागभांडवलावरती तो आपली उभारणी किंवा प्रगती करू शकत नाही. तो पैसा अनेक राष्ट्रीयकृत बँका, वित्तीय संस्था, सहकारी बँका, जिल्हामध्यवर्ती बँकामुळे अर्थसाहय केल्याशिवाय पर्याय रहात नाही. सुरूवातीच्या कालावधी मध्ये कारखाना उभा करणे, जागा विकत घणे, प्राथमिक बांधकाम, करने, रस्ते तयार करने, शासकीय स्थरावरील मान्यता मिळवणे या सर्व बाबीसाठी कारखान्याचे मुख्यप्रवर्तक व संचालक मंडळाने बँकाकडून कर्ज घेण्याचे ठरवले. राष्ट्रीयकृत व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका, इतर सहकारी बँकेकडून तारण कर्ज व बिगर तारण कर्ज, दीर्घमुदतीचे कर्ज, मध्यम मुदतीचे कर्ज घेवून कारखान्याची उभारणी व विस्तार केला.लोकनेते बाबुराव पाटील सहकारी साखर साखर कारखाना उभा करुन चालू करण्यासाठी वरीलप्रमाणे राष्ट्रीयकृत बँका, सहकारी संस्था, सहकारी बँका, इतर मार्गानी कर्ज घेतले होते. या आर्थिक संस्थानी कर्जपुरवठा केला. म्हणूनच कारखाना अल्पावधीमध्ये उभा राहीला. आणि माढा तालुक्यात वाढत्या सिंचन सुविधेमुळे ऊस क्षेत्र वेगाने वाढले. त्यामुळे ऊसाचा मोठा प्रश्न निर्माण होणार होता, तो या कारखान्यामुळे मिटला आहे. सन २००१-०२ ते २००५-०६ या कालावधीमध्ये लोकनेते बाबुराव पाटील सहकारी साखर साखर कारखान्याने तारणावरती दीर्घमुदतीचे व मध्यममुदतीचे एकूण कर्ज १,२९,१४,८६,९३० रु. एवढे होते. त्याचप्रमाणे २००१-०२ ते २००५-०६ या कालावधीमध्ये बिगरतारण कर्ज वरील बँका व इतर संस्थाच्याकडून ११६२७९८६३ एवढे कर्ज घेतले होते. त्यामुळे कारखाना उभा राहून सुस्थितीत चालत असून शेतकऱ्यांच्या ऊसाला न्याय मिळत आहे. या बँकानी कारखान्याच्या विकासामध्ये मोठा हातभार लावला. त्यामुळे हा कारखाना अल्पावधित उभा राहीला.[२३]

कारखान्याने बांधकाम सुरू झाल्यापासून मजुरांची संख्या वाढली त्यामुळे काम करणाऱ्या मजूरांना व कारखान्यातील अधिकाऱ्यांना दैनिक गरजेसाठी लागणाऱ्या वस्तूची आवश्यकता भासू लागली. त्यामुळे कारखान्यावरती काम करणाऱ्या मजूरांना जेवणाची गरज असल्याने छोट्या-मोठ्या खानावळी सूरू झाल्या. पानपट्टी, चहाटपरी, करमणुकीच्या साधनामध्ये रिडिओ टिव्ही दुरूस्तीचे दूकाने, लाकडाचे अड्डे, थंडपेयाची दूकाने, मांसाहारी शाकाहारी हॉटेल, नाव्हयाची दुकाने, शिलाईसाठी लागणारे टेलर, चपलासाठी चर्मकार कामगाराची दुकाने, लोहार, गिसाडी, कपडे दुकान, किराणा मालाचे दुकाने, भाजी विक्रते, दुध विक्रेते अशी एकदुसऱ्यावर अवलंबून असणारे उद्योगधंद्याची छोटे मोठे, कुटीर उद्योग सुरू झाले. त्यामुळे वरील प्रकारे उपउद्योग कारखान्यामुळे चालू लागले. त्यामुळे शेकडो कुटूंबाना रोजगार मिळाला. त्यातूनच मोठ्या उद्योगाची भरभराट होऊ लागली. मोहोळ शहरामध्ये आवक-जावक ज्यादा वाढल्याने उद्योगधंद्याची भरभराट झाली. यातूनच तालुक्याचा आर्थिक विकास झाला.[२४]

## शेतकऱ्यांचा आर्थिक विकास :

या परिस्थतीमध्ये साखर कारखाना झाल्यामुळे ऊस उत्पादक शेतकऱ्यांना फार मोठा फायदा झाला. उजनी धरणाचा कोणताही फायदा होत नसलेल्या मोहोळ तालुक्यातील गावांना २००४-०५ नंतर कोल्हापूर पध्द्तीच्या बंधाऱ्यामुळे फायदा झाला. नदी काठावरील शेती

ओलिताखाली आली तसेच ५ ते ६ कि.मी. पर्यंत पाईपलाईन करुन लोकांनी शेतीला पाणी पुरवठा केल्याने बागायती क्षेत्र वाढले. ऊस क्षेत्र मोठ्या प्रमाणात वाढले शासनाच्या अनेक स्किममधून आपले उत्पादन वाढवण्याचा प्रयत्न केला. साखर कारखान्यामुळे शेताकऱ्यांचा फायदा झाला. बागायती क्षेत्र वाढल्याने उपव्यवसायदेखील वाढले. त्यामुळे शेतकऱ्यांची सावकारांच्या पैश्यातून सुटका झाली. हातात चार पैसे खेळू लागले. त्यामुळे त्यांचे जीवनमान उंचावले. समाजामध्ये मोलाचे स्थान मिळाले, समाजामध्ये प्रतिष्ठा वाढली. आर्थिक परिस्थिती बदल्यामुळे वाहनांची संख्या वाढली, बाजारांमध्ये पैशाची आवक वाढली धंदे, व्यवसाय भरभराटीस आले. त्यामुळे तालुक्याचा आर्थिक विकास झाला. त्यामुळे जिल्ह्याच्या विकासाला हातभार लागला यातूनच आपल्या राज्याचा विकास झाल्याचे दिसून येते.[२५] वंसतदादा शुगर इन्स्टिट्यूडचा बेस्ट टेक्नीकल इफीशिअन्सीचे प्रथम पारितोषिक इ. स. २००५-०६ वंसतदादा शुगर इन्स्टिट्यूडचा बेस्ट फायनांन्सीयल मॅनेजमेंट पारितोषिक इ. स. २००५-०६. अशाप्रकारची पारितोषिके मिळाल्याने महाराष्ट्रामध्ये या कारखान्याचा नावलौकीक वाढला.

## संदर्भ :


१) लोकनेते बाबुराव पाटील सह. साखर कारखाना, ऑफीस माहितीवरुन, २ जून २०१२.
२) वार्षिक अहवाल, लोकनेते बाबुराव पाटील सहकारी साखर कारखाना, अनगर, २००१-०२, २००६-०७, पृ. ३, ०५.
३) ग्रामपंचायत अनगर, ता. मोहोळ, सर्वसाधारण सभा, १ ऑगस्ट २००३.
४) वार्षिक अहवाल, लोकनेते बाबुराव पाटील सहकारी कारखाना, अनगर, २००१-०२, २००६-०७, पृ. ६.
५) वार्षिक अहवाल, लोकनेते सहकारी साखर कारखाना, लक्ष्मी नगर, अनगर, २००१-०२, २००६-०७, पृ. ७.
६) मुलाखत, काळे बी. व्ही., मुख्यशेती अधिकारी, लोकनेते सहकारी साखर कारखाना, लक्ष्मी नगर, अनगर, १ जून २०१०.
७) मुलाखत, फायनान्स मॅनेजर, लोकनेते बाबुराव पाटील सहकारी साखर कारखाना, लक्ष्मी नगर, अनगर, २ सप्टेंबर, २०१२.
८) मुलाखत, कुलकर्णी एच. बी., लोकनेते बाबुराव पाटील सहकारी साखर कारखाना, लक्ष्मी नगर, अनगर, ११ ऑगस्ट २००९.
९) वार्षिक अहवाल, लोकनेते बाबुराव पाटील सहकारी साखर कारखाना, लक्ष्मी नगर, अनगर, २००६-०७.
१०) मुलाखत, बेल्हेकर एस. एस., प्रभारी कार्यकारी संचालक, लोकनेते बाबुराव पाटील सहकारी साखर कारखाना लक्ष्मी नगर, अनगर, २१ जुलै २००९.
११) मुलाखत, गवळी जी. एन., सिनीअर अकौटंट, लाेकनेते बाबुराव पाटील सहकारी साखर कारखाना, लक्ष्मी नगर, अनगर, ९ ऑगस्ट २०१०.
१२) वार्षिक अहवाल, लाेकनेते बाबुराव पाटील सहकारी साखर कारखाना, लक्ष्मी नगर, अनगर, २००१-०२, २००५-०६.
१३) मुलाखत, कुलकर्णी इ. व्ही. कार्यकारी संचालक, लाेकनेते बाबुराव पाटील सहकारी साखर कारखाना, लक्ष्मी नगर, अनगर, २ फेब्रुवारी २०१०.
१४) वार्षिक अहवाल, लाेकनेते बाबुराव पाटील सहकारी साखर कारखाना, लक्ष्मी नगर, अनगर, २००१-०२, २००५-०६, पृ. ७.
१५) मुलाखत, संस्थापक चेअरमन, पाटील राजन, लोकनेते बाबुराव पाटील सहकारी साखर कारखाना, लक्ष्मी नगर, अनगर, ५ नोव्हेंबर २००९.
१६) खत पुरवठा माहिती पुस्तिका, लोकनेते बाबुराव पाटील सहकारी साखर कारखाना, लक्ष्मी नगर, अनगर, २०१०, पृ. १३.
१७) वार्षिक अहवाल, लाेकनेते बाबुराव पाटील सहकारी साखर कारखाना लक्ष्मी नगर, अनगर २००५-०६, पृ.९
१८) मुलाखत, बेल्हेकर एस. एस., वर्क मॅनेजर, लाेकनेते बाबुराव पाटील सहकारी साखर कारखाना, लक्ष्मी नगर, अनगर, १ ऑगस्ट २००९.
१९) वार्षिक अहवाल, लाेकनेते बाबुराव पाटील सहकारी साखर कारखाना, लक्ष्मी नगर, अनगर २००४-०५, पृ. २७.
२०) वार्षिक अहवाल, लाेकनेते बाबुराव पाटील सहकारी साखर कारखाना, लक्ष्मी नगर, अनगर, २००५-०६, पृ. ५.
२१) मुलाखत, कुलकर्णी एच. बी., लाेकनेते बाबुराव पाटील सहकारी साखर कारखाना, लक्ष्मी नगर, अनगर, ५ ऑगस्ट २०११.
२२) वृक्षलागवड फाईल, लाेकनेते बाबुराव पाटील सहकारी साखर कारखाना, लक्ष्मी नगर, अनगर, १३ फेब्रवारी २०१२, पृ. ३.
२३) वार्षिक अहवाल, लोकनेते बाबुराव पाटील सहकारी साखर कारखाना, लक्ष्मी नगर, अनगर, २००६-०७, पृ. २४.
२४) मुलाखत, काळे बी. व्ही., मुख्यशेती अधिकारी, लोकनेते बाबुराव पाटील सहकारी साखर कारखाना, लक्ष्मी नगर, अनगर, ४ ऑक्टोंबर २०१२.
२५) मुलाखत, चेअरमन पोटरे हणुमंत, लोकनेते बाबुराव पाटील सहकारी साखर कारखाना, लक्ष्मी नगर, अनगर, ५ ऑगस्ट २०१०.